Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 06 December 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०६ डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज देशभरात त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भूवनेश्वर इथं आंबेडकर यांना आदरांजली वाहिली.

उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी संसद भवन परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली. पंतप्रधान मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात देखील आंबेडकर यांना अभिवादन केलं आहे. समता आणि माणसांच्या सन्मानासाठी आंबेडकरांनी दिलेला अथक लढा अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील, त्यांचं स्वप्न पूर्ण करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करत असल्याचं, पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी मुंबईत दादरच्या चैत्यभूमीवर राज्यभरातून मोठ्या संख्येनं अनुयायी दाखल झाले आहेत.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चैत्यभूमी इथं बाबासाहेबांना अभिवादन केलं. यानंतर आयोजित कार्यक्रमात बोलताना राज्यपालांनी, भारताची लोकशाही बळकट करण्याचं काम राज्यघटनेनं केलं असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानामुळे आपला देश उत्तरोत्तर प्रगती करत असल्याचं नमूद केलं. देशाच्या कानाकोपऱ्यातून अस्पृश्यतेचं उच्चाटनं करणं हीच आंबेडकरांना आपण वाहिलेली खरी श्रद्धांजली असेल, असंही राज्यपाल म्हणाले.

भारत संविधानच्या मार्गानंच जगातली महाशक्ती बनू शकतो, भारताच्या संविधानानुरुप आपलं आचरण असेल आणि कोणत्याही धर्मग्रंथापेक्षा महत्वाचं भारताचं संविधान असेल, असं मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

आंबेडकरांचे विचार जागृत ठेवण्यासाठी आम्ही कुठेही कमी पडणार नाही, असं आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं, तर महायुतीचं सरकार आंबेडकरांचे विचार आणि संविधानाला आदर्श मानून कारभार करेल आणि व्यापक जनहिताचेच निर्णय घेईल, असं अजित पवार यावेळी म्हणाले.

****

हिंगोली जिल्ह्यात विविध ठिकाणी डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी सभा आणि कार्यक्रम होत आहेत. हिंगोली इथल्या डॉक्टर आंबेडकर पुतळा परिसरात अनुयायांची मोठी गर्दी झाली असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं रेपो दर सहा पूर्णांक पाच इतका कायम ठेवला आहे. बँकेच्या पतधोरण समितीच्या बैठकीनंतर गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज ही माहिती दिली.

****

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्ली इथं अष्टलक्ष्मी महोत्सवाचं उदघाटन करणार आहेत. भारत मंडपम इथं तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात ईशान्य भारतातल्या आठही राज्यांची संस्कृती, वस्त्रोद्योग, कलाकुसर, पर्यटनाच्या संधी आणि वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांच्या प्रदर्शनाचा समावेश असेल. अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्कीम आणि त्रिपुरा या आठ राज्यांमधले अडीचशे कारागीर या महोत्सवात सहभागी होणार आहेत.

****

भारतीय अंतराळ संशोधन संस्था – इस्रोनं श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रावरून काल दुपारी प्रोबा–3 या उपग्रह वाहून नेणाऱ्या पी एस एल व्ही सी – 59 या प्रक्षेपकाचं यशस्वीरित्या प्रक्षेपण केलं. युरोपीय अंतराळ संस्थेच्या प्रोबा 3 उपग्रहांना यशस्वीरीत्या कक्षेत स्थापित करण्यासाठी पीएसएलव्ही सी 59 चं प्रक्षेपण करण्यात आलं असल्याची माहिती इस्रोनं दिली आहे. प्रोबा 3 ही युरोपियन अंतराळ संस्थेची महत्त्वाची मोहीम असून त्याअंतर्गत आणखी दोन उपग्रह अंतराळात सोडण्यात आले आहेत.

****

राज्यसभेत काल भारतीय वायुयान विधेयक २०२४ मंजूर झालं. लोकसभेत हे विधेयक पावसाळी सत्रात मंजूर झालं आहे. या विधेयकात विमानाचं उत्पादन, देखरेख, दुरुस्ती, आयात तसंच अपघात झाल्यास त्याची चौकशी याबद्दलचे नियम आहेत.

गेल्या १० वर्षात देशभरात साडेदहाहजाराहून अधिक नवीन टपाल कार्यालयं उघडली असून, त्यातली ९० टक्के कार्यालयं ग्रामीण भागात, तर पाच हजाराहून अधिक कार्यालयं नक्षलवादी चळवळीने प्रभावित क्षेत्रात आहेत, अशी माहिती, केंद्रीय दूरसंवाद राज्यमंत्री चंद्रशेखर पेम्मासानी यांनी राज्यसभेत दिली.

****

लातूर जिल्ह्यात औसा तालुक्यातल्या किल्लारी इथल्या शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या ४१ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ ऊस उत्पादकांच्या हस्ते काल करण्यात आला. कारखान्याचा गळीत हंगाम सुरु झाला असल्यामुळे ऊस उत्पादकांनी चांगल्या प्रतीचा ऊस कारखान्यास पुरवठा करुन सहकार्य करावं, असं आवाहन कारखाना प्रशासनाकडून यावेळी करण्यात आलं.

****

भारत आणि ऑस्ट्रेलियादरम्यान बॉर्डर – गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला दुसरा सामना ॲडलेड इथं सुरु झालं आहे. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. पहिला सामना जिंकून भारत मालिकेत एक – शून्यनं आघाडीवर आहे.

****

येत्या दोन दिवसात, राज्याच्या बहुतांश भागात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. छत्रपती संभाजीनगर शहर आणि परिसरात आज सकाळी जोरदार पाऊस झाला.

जालना शहरासह जिल्ह्यात पहाटेपासून ढगाळ वातावरण असून मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे.

****